|| आजचा सुविचार ||

सामान्य दिसणारे लोकच
जगात सर्वात चांगले लोक असतात.
म्हणूनच देव अश्या
लोकांनाच जास्ती निर्माण करतो.

दैनिक **अक्षराज**

अचूक वेध, अचूक बातमी

संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध

Email : newsaksharaj2021@gmail.com

खालील (क्यू आर कोड) स्कॅन करा...
आणि अक्षराज मीडियाच्या व्हाट्सअप चॅनल ला फॉलो करा व मिळवा सर्व घडामोडींचे अपडेट्स एकाच वेळी एकाच ठिकाणी...

कृपया इथे स्कॅन करा — Plz Scan Here

वर्ष : ०६ | अंक : ७९, पाने : ०४, किंमत : ०३ रुपये | बुलडाणा, रविवार, दि.०१ नोव्हेंबर २०२६ | संपादक : विनोद कैलास गोरे | RNI NO. : MAHMAR/2022/82056

राष्ट्रपती मुर्मू यांच्या हस्ते त्र्यंबकेश्वरला सिंहस्थ ध्वजपूजन व गोदावरी पूजन संपन्न

अक्षराज : सुनील क्षिरसागर

दि.३१, विंचूर (नाशिक) : राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते आज त्र्यंबकेश्वर येथील पवित्र कुशावर्त तीर्थावर सिंहस्थ कुंभमेळ्यानिमित्त ध्वजपूजन सोहळा धार्मिक व मंगलमय वातावरणात संपन्न झाला. यावेळी राष्ट्रपतींच्या हस्ते गौतमी गंगा गोदावरी पूजन, सिंहस्थ ध्वजपूजन, विशेष अर्घ्य अर्पण तसेच गोदावरी आरती करण्यात आली.

या सोहळ्यास राज्यपाल जिष्णू देव वर्मा, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार, पालकमंत्री गिरीश महाजन, शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे, रोहयो व राजशिष्टाचार मंत्री जयकुमार रावल यांची प्रमुख उपस्थिती होती.

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांचे कुशावर्त येथे आगमन झाल्यानंतर धार्मिक विधींना प्रारंभ झाला. पुरोहितांच्या मंत्रोच्चारात राष्ट्रपतींच्या हस्ते पवित्र गौतमी गंगा गोदावरीचे विधिवत पूजन करण्यात आले. त्यानंतर सिंहस्थ ध्वजाचे पूजन करण्यात आले. विशेष अर्घ्य अर्पण करून गोदावरीची आरती करण्यात आली. वैदिक मंत्रघोष आणि धार्मिक विधींमुळे कुशावर्त तीर्थ परिसरात भक्तिमय वातावरण निर्माण झाले होते.

सिंहस्थ कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर आयोजित या धार्मिक सोहळ्यास विशेष महत्त्व प्राप्त झाले. कुशावर्त तीर्थ हे गोदावरी नदीचे पवित्र स्थान असून सिंहस्थ कुंभमेळ्याच्या धार्मिक परंपरेत या तीर्थाला अनन्यसाधारण महत्त्व आहे.

या कार्यक्रमास आमदार गोकुळ गीते, आमदार अ‍ॅड. माणिकराव कोकाटे, आमदार दिलीप बनकर, आमदार हिरामण खोसकर, नगराध्यक्षा त्रिवेणी तुंगार,

विभागीय आयुक्त डॉ. प्रवीण गेडाम, जिल्हाधिकारी आयुष प्रसाद, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी ओमकार पवार, पुरोहित संघाचे अध्यक्ष मनोज थेटे, श्री हरिगिरीजी महाराज, विविध आखाड्यांचे साधू, महंत, स्थानिक राहिवासी आदी उपस्थित होते.

या प्रसंगी पुरोहित संघाच्यावतीने राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांना सन्मानपूर्वक ताम्रपट प्रदान करण्यात आला.

'महाराष्ट्राची भूमी ही अमृतभूमी आहे. या पावन भूमीला मी कोटी कोटी प्रणाम करते,' अशा शब्दांत राष्ट्रपतींनी महाराष्ट्राविषयीच्या आपल्या भावना व्यक्त केल्या. त्र्यंबकेश्वरच्या दर्शनाने कृतार्थ झाल्याचे सांगताना भगवान शंकराचे पावन सान्निध्य लाभलेली त्र्यंबकेश्वरची भूमी, प्रभू श्रीरामांच्या वनवासाच्या स्मृती जपणारी नाशिकची तपोभूमी आणि सर्वांना आशीर्वाद देणारी गोदावरी नदी यांचे आध्यात्मिक महत्त्व त्यांनी अधोरेखित केले. गोदावरीच्या महाआरतीत सहभागी होण्याचा मान मिळाल्याबद्दल त्यांनी समाधान व्यक्त केले.

भारतात धार्मिक आणि आध्यात्मिक सोहळ्यांची प्राचीन परंपरा असून सुमारे चौदाशे वर्षांपूर्वीही लोक मोठ्या श्रद्धेने अशा आयोजनांमध्ये सहभागी होत असल्याच्या ऐतिहासिक नोंदी आढळतात, असे राष्ट्रपतींनी सांगितले. काळ बदलला, पिढ्या बदलल्या; मात्र भारतीयांच्या मनातील श्रद्धेचा प्रवाह अखंड राहिला आहे. कुंभपर्व हे केवळ आस्थेचे प्रतीक नसून सामाजिक एकात्मता आणि सकारात्मक परिवर्तनाचा संदेश देणारे पर्व आहे. आगामी सिंहस्थ कुंभपर्वाला आधुनिकतेचे नवे आयाम जोडले जातील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

मुंबईहून कोकण आणि गोव्याला जाणाऱ्या प्रवाशांना खुशखबर

दि,३१, मुंबई : आगामी दिवाळी सुट्टीत कोकणासह गोव्याला जाण्यासाठी वेगवान आणि आधुनिक रेल्वेगाडीचा पर्याय प्रवाशांसाठी उपलब्ध होणार आहे. छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस ते मडगावदरम्यान धावणाऱ्या वंदे भारत एक्स्प्रेस आता १६ डब्यांसह धावणार आहे. दिवाळी पाडवा अर्थात १० नोव्हेंबरपासून ही गाडी प्रवासी सेवेत दाखल होणार आहेत. यामुळे प्रवासी आसन क्षमतेत दुपटीने वाढ होणार असून सहकुटुंब पर्यटनाला जाणाऱ्या प्रवाशांना याचा मोठा लाभ होणार आहे.

दिवाळीनंतर सुरू होणाऱ्या पर्यटन हंगामासाठी प्रवासी आणि पर्यटकांनी आता तयारी सुरू केली आहे. थंडीत कोकण आणि गोव्यातील पर्यटन स्थळांना भेट देण्याकडे पर्यटकांचा नेहमी कल असतो. मुंबई-कोकणदरम्यान वेगवान आणि आधुनिक सुविधा असलेली वंदे भारत ही एकमेव गाडी आहे. ही गाडी आठ डब्यांसह धावते. कमी डब्यांमुळे या गाडीचे आरक्षण सातत्याने पूर्ण होत असल्याने प्रवाशांनी प्रतीक्षा यादीतील तिकीट ही उपलब्ध होत नाही. ऐन पर्यटनाच्या हंगामात ही गाडी आठ डब्यांऐवजी १६ डब्यांसह धावणार असल्याने पर्यटकांना दिलासा मिळणार आहे.

पुण्यात ३३ वर्षीय विवाहितेने लेकासह आयुष्य संपवलं...

दि,३१, पिंपरी : पुणे जिल्ह्यातील पिंपरी चिंचवड भागातील डांगे चौक येथील सिग्नेचर पार्क सोसायटीमध्ये ३३ वर्षीय महिलेने आपल्या सहा वर्षांच्या मुलासह इमारतीच्या अठराव्या मजल्यावरील डक्टमधून उडी घेऊन आयुष्याची अखेर केली. या घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे. लेकरासह जीव देण्यामागील नेमके कारण अद्याप समजू शकले नाही.

एकता मनोज भांगड (वय ३३, रा. सिग्नेचर पार्क सोसायटी, डांगे चौक, थेरगाव) आणि माधव (वय ६) असे आत्महत्या केलेल्या मायलेकाचे नाव आहे.

पती आयटी कंपनीत...

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, भांगड कुटुंब मूळचे राजस्थान येथील असून, पती मनोज भांगड हे येरवडा येथील आयटी पार्कमध्ये एका कंपनीत नोकरीला आहेत. भांगड कुटुंब गेल्या दोन वर्षांपासून डांगे चौकातील सिग्नेचर पार्क सोसायटीमध्ये वास्तव्यास होते. शुक्रवारी सकाळी दहा वाजताच्या सुमारास मनोज हे नेहमीप्रमाणे कामावर गेले होते. त्या वेळी घरात त्यांची पत्नी एकता आणि मुलगा माधव उपस्थित होते.

सायंकाळी साडेसहा वाजताच्या सुमारास अचानक इमारतीच्या अंतर्गत डक्टमधून मोठा आवाज झाला. आवाजाने सतर्क झालेल्या रहिवाशांनी तातडीने खाली धाव घेतली असता एकता व माधव रक्ताच्या थारोळ्यात निपचित पडल्याचे दिसले. नागरिकांनी तत्काळ वाकड पोलिसांना पाचारण केले.

'सीसीटीव्ही'ची मदत : घटनेची माहिती मिळताच वाकड पोलिस ठाण्याचे पथक घटनास्थळी दाखल झाले. पोलिसांनी इमारतीमधील 'सीसीटीव्ही' फुटेजची कसून पडताळणी केली असता, एकता या मुलगा माधव याला सोबत घेऊन लिफ्टने थेट १८ व्या मजल्यावर जाताना दिसल्या. १८ व्या मजल्यावरील गॅलरीजवळ दोघांचीही पादत्राणे आढळली आहेत. त्यामुळे एकता यांनी मुलासह स्वतः उडी मारून आत्महत्या केल्याचे प्रथमदर्शनी दिसून येत आहे.

जिल्हा बँकेच्या सारीपाटावर कोण प्यादे, कोण राजे? विखे-लंके संघर्षात राजकीय प्रतिष्ठा पणाला

राहुल शिंदे यांच्या भूमिकेची चर्चा; ठरावधारकांच्या मतदानातून राजकीय समीकरणांची कसोटी

अक्षराज : राजकुमार इकडे

दि,३१, सुपा (अहिल्यानगर) : ल्यानगर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेची निवडणूक आता केवळ सहकार क्षेत्रापुरती मर्यादित राहिलेली नाही. या निवडणुकीच्या निमित्ताने जिल्ह्यातील राजकीय शक्तींची समीकरणे, नेत्यांची प्रतिष्ठा आणि परस्परांतील राजकीय संघर्ष पुन्हा एकदा चर्चेच्या केंद्रस्थानी आले आहेत. वरकरणी उमेदवारांची लढाई दिसत असली, तरी या राजकीय सारीपाटावर नेमके प्यादे कोण आणि राजकीय डाव खेळणारे कोण, हा प्रश्न उपस्थित होत आहे.

या निवडणुकीच्या चर्चेत राहुल शिंदे यांची भूमिका महत्त्वाची ठरत असली, तरी व्यापक राजकीय विश्लेषणात खरी रस्सीखेच विखे आणि लंके या दोन राजकीय गटांमध्ये असल्याचे चित्र मांडले जात आहे. राहुल शिंदे हे या मोठ्या राजकीय डावातील प्यादे ठरणार की स्वतंत्र राजकीय भूमिका बजावणार, याकडेही लक्ष लागले आहे.

ठरावधारकांचे मतदान की राजकीय दबावाचे गणित?

या निवडणुकीतील सर्वांत महत्त्वाचा मुद्दा म्हणजे मतदारांचे स्वरूप. ही सर्वसामान्य जनतेची निवडणूक नाही. सेवा संस्थांचे ठरावधारक आणि संस्थात्मक मतदार या निवडणुकीत मतदान करणार आहेत. त्यामुळे लोकभावनेपेक्षा संस्थांवरील पकड, स्थानिक राजकीय संबंध आणि नेत्यांचे प्रभावक्षेत्र यांना अधिक महत्त्व प्राप्त झाले आहे.

अशा परिस्थितीत मतदान खरोखर स्वतंत्र विचाराने होणार की राजकीय दबाव, वैयक्तिक संबंध आणि सत्तेच्या समीकरणांतून ठरणार, हा प्रश्न उपस्थित होत आहे. मतदारांना आपली भूमिका स्वतंत्रपणे मांडता येणार की त्यांना राजकीय निष्ठेच्या चौकटीत अडकवले जाणार, याचीही चर्चा सुरू आहे.

'लाचारीच्या मतदानावर विजयाचा डाव' ही या निवडणुकीतील चर्चेची एक महत्त्वाची बाजू आहे. मतदारांना आपल्याकडे वळवण्यासाठी कोण कोणत्या पातळीपर्यंत जाणार, यापेक्षा मतदार आपला स्वाभिमान आणि संस्थेचे हित जपणार का, हा खरा प्रश्न आहे.

खाणाऱ्यालाच खाणा लावणारे आता कोणासमोर झुकणार?

जिल्हा बँकेच्या राजकारणात अनेक वर्षे सहकाराच्या माध्यमातून राजकीय समीकरणे जुळवली गेली. सहकारी संस्था, साखर कारखाने आणि त्यांच्याशी संबंधित राजकीय नेतृत्व यांचा एकमेकांवर प्रभाव राहिला आहे. मात्र आता या निवडणुकीत पूर्वी राजकीय समीकरणे जुळवणारेच नव्या समीकरणांच्या कात्रीत सापडण्याची शक्यता आहे.

खाणाऱ्यालाच खाणा लावणारे आता कोणासमोर झुकणार, हा प्रश्न उपस्थित होत आहे. राजकीय ताकद, आर्थिक प्रभाव आणि संस्थात्मक मतदान यांचा वापर कोणत्या पद्धतीने होतो, यावर या निवडणुकीची चर्चा रंगली आहे.

विखे राजकीय हिशेब चुकते करणार?

लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर विखे आणि लंके यांच्यात झालेल्या राजकीय संघर्षाची पारनेरमधील जिल्हा बँकेची निवडणूक ही पुढची राजकीय फेरी मानली जात आहे. पारनेरमध्ये नीलेश लंके यांच्या विरोधात राहुल शिंदे पाटील मैदानात असल्याने या लढतीला विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे.

लोकसभा निवडणुकीतील राजकीय संघर्षानंतर जिल्हा बँकेच्या निवडणुकीतून विखे गट आपला राजकीय प्रभाव दाखवण्याचा प्रयत्न करणार का, याची चर्चा राजकीय वर्तुळात आहे. मात्र या लढतीचा निकाल केवळ दोन उमेदवारांच्या विजय-पराभवापुरता मर्यादित राहणार नाही. त्यातून जिल्ह्यातील राजकीय शक्तींचे परस्पर संबंध आणि आगामी राजकारणातील त्यांचे स्थानही अधोरेखित होऊ शकते.

पवार, विखे, थोरात या तीन शक्तींच्या प्रभावाची परीक्षा!

महाराष्ट्राच्या राजकारणात पवार, विखे आणि थोरात या तीन घराण्यांचे राजकीय वजन आणि सहकार क्षेत्रातील प्रभाव महत्त्वाचा राहिला आहे. अहिल्यानगर जिल्हा बँकेच्या निवडणुकीत मात्र पारंपरिक राजकीय विरोधक असलेले विखे आणि थोरात एकत्र आल्याने नव्या समीकरणाची निर्मिती झाली आहे.

या एकत्रीकरणामुळे जिल्ह्यातील राजकीय चर्चेला वेगळे वळण मिळाले आहे. दुसरीकडे खासदार नीलेश लंके आणि त्यांच्या समर्थकांनी निवडणुकीत स्वतंत्र आव्हान उभे केले आहे. त्यामुळे ही निवडणूक केवळ जिल्हा बँकेच्या संचालक मंडळापुरती न राहता तीन प्रमुख राजकीय शक्तींच्या प्रभावाची कसोटी ठरत आहे.

या निवडणुकीत विखे गटाला अपेक्षित यश मिळाले नाही, तर त्यांच्या राजकीय प्रभावाबाबत प्रश्न उपस्थित होऊ शकतात. त्याचप्रमाणे विखे-थोरात युतीच्या राजकीय ताकदीचेही मूल्यमापन होईल. पवार गटासाठीही ही निवडणूक सहकार क्षेत्रातील आपले अस्तित्व आणि संघटनात्मक ताकद दाखवण्याची संधी आहे.

'डिजिटल अरेस्ट'

पूर्वी दरोडेखोर घरांवर दरोडा टाकून घरातील मौल्यवान वस्तू आणि रोख रक्कम लुबाडून नेत असत पण आज काळ बदलला आजचे युग हे डिजिटल युग आहे आणि या डिजिटल युगात दरोड्याची पद्धतही बदलली. दरोडेखोरही डिजिटल झाले आणि दरोड्याची पद्धत डिजिटल झाली. आज दरोडेखोर तंत्रज्ञानाचा वापर करून लोकांची लुबाडणूक करतात त्यालाच सायबर गुन्हा असे म्हणतात. सायबर गुन्हेगार नागरिकांना तंत्रज्ञानाचा वापर करून नागरिकांना लुबाडण्याचा नवा नवा फंडा शोधत असतात कधी ते क्रेडिट कार्डची माहिती विचारून तर कधी बँक खात्याची माहिती विचारून अवघ्या काही सेकंदात नागरिकांचा बँक बॅलन्स शून्य करतात. जेंव्हा खात्यातून पैसे गायब होतात तेंव्हाच नागरिकांना आपली लुबाडणूक झाली हे लक्षात येते मात्र तोवर खूप उशीर झालेला असतो. सायबर गुन्हेगार फसवणूक झालेल्या नागरिकांचा बँक बॅलन्स शून्य करतात बरे हे सायबर गुन्हेगार शोधणे हे पोलिसांसाठीही मोठे जिकिरीचे काम असते कारण हे गुन्हेगार अदृश्य चेहऱ्याचे असतात. हे सायबर गुन्ह्याचे नवेनवे फंडे शोधून काढत असतात असाच ' डिजिटल अरेस्ट' हा नवा फंडा सायबर गुन्हेगारांनी शोधून काढला आहे. सध्या डिजिटल अरेस्टच्या नावे फसवणूक आणि लुटीचा सुळसुळाट सुरू आहे. डिजिटल अरेस्टद्वारे फसवणूक झाल्याचा प्रकार सध्या रोजच घडत आहे. यात सायबर गुन्हेगार जेष्ठ नागरिकांना लक्ष करतात आणि त्यांना डिजिटल अरेस्टची भीती घालून त्यांच्याकडून लाखोंची, करोडोंची लूट करतात. असाच प्रकार मागील वर्षी पुण्यात घडला. डिजिटल अरेस्टची भीती दाखवून सायबर गुन्हेगारांनी ८३ वयाच्या निवृत्त सरकारी अधिकाऱ्याला तब्बल १ कोटी २० लाखांना गंडा घातला गेला. याचा प्रचंड मानसिक त्रास झाल्याने त्या व्यक्तीचा मृत्यू झाला. याआधी हरियाणातही एका वृद्ध दांपत्याला अशाच प्रकारे डिजिटल अरेस्टची भीती दाखवून एक कोटी रुपयांना लुबाडले. डिजिटल अरेस्ट करताना सायबर गुन्हेगार श्रीमंत असणाऱ्या ज्येष्ठ नागरिकांना लक्ष करतात. सायबर गुन्हेगार जेष्ठ नागरिकांना व्हिडिओ कॉल करून आपण पोलिस, ईडी, सिआयडी, सीबीआय, प्राप्तिकर विभाग, लष्करी अधिकारी असल्याची बतावणी करतात. देशविघातक कृत्य, बेकायदेशीर वस्तू, ड्रग्स, बनावट पासपोर्ट, दहशतवाद्यांशी संबंध असल्याचे सांगून जेष्ठ नागरिकांना डिजिटल अरेस्ट केल्याचे संगीतात. पीडितांना विश्वास बसावा यासाठी ते न्यायालयाचे बनावट आदेशही पाठवतात. सायबर गुन्हेगार पीडित व्यक्तीला २४ तास त्यांच्या घरातच व्हिडिओ कॉलवर बंदिस्त अर्थात नजर कैदेत ठेवतात. सायबर गुन्हेगार व्हिडिओ कॉलवर कुठल्या तरी पोलिस स्टेशन किंवा सीबीआयच्या कार्यालयातून बोलत असल्याचे भासवतात. त्यामुळे पीडित व्यक्तीला त्यांच्यावर विश्वास बसतो. पीडित व्यक्ती आपण खरेच डिजिटल अरेस्ट झाल्याचे मानतो आणि तुरुंगात जावे लागू नये म्हणून सायबर गुन्हेगार मागतील तेवढी खंडणी त्याला देण्यास तयार होतात. सायबर गुन्हेगार ही खंडणी ऑनलाईन वसूल करतात. अवघ्या काही तासात सायबर गुन्हेगार या जेष्ठ नागरिकांकडून लाखो करोडो रुपये लुबाडतात. सायबर गुन्हेगारांनी डिजिटल अरेस्ट हा नवा फंडा वापरून कोट्यवधी रुपये लुबाडल्याचे समोर आले आहे. मागील वर्षी डिजिटल अरेस्टचे तब्बल २०० च्या वर गुन्हे नोंदवले गेले आहेत. या आकडेवारी वरुनच याची व्याप्ती किती मोठी आहे हे आपल्या लक्षात येईल. डिजिटल अरेस्टचे गुन्हेगार शोधणे सायबर पोलिसांसाठी मोठी डोकेदुखी बनली आहे कारण हे सर्व गुन्हेगार अदृश्य चेहऱ्याचे असतात आणोबते गुन्हा देखील आभासी पद्धतीने करतात. सायबर गुन्हेगार देशातील कोणत्याही भागातून किंवा अगदी परदेशातूनही हा गुन्हा करतात त्यामुळे त्यांना शोधणे पोलिसांना सहज शक्य होत नाही. सायबर पोलिस या गुन्हेगारांना शोधण्याचा सर्वोतोपरी प्रयत्न करत असतातच मात्र नागरिकांनीही याबाबत सतर्क राहायला हवे. भारतीय कायद्यात कोठेही डिजिटल अरेस्टला थारा नाही. आपल्या कायद्यानुसार डिजिटल अरेस्टला कोणतीही मान्यता नाही याची नोंद नागरिकांनी घ्यायला हवी. पोलिस किंवा कोणतीही सरकारी यंत्रणा आपल्याला डिजिटल अरेस्ट करू शकत नाही. मात्र हे खूप कमी लोकांना माहीत आहे म्हणूनच याबाबत जनजागृती व्हायला हवी. नागरिकांना विशेषतः ज्येष्ठ नागरिकांना याबाबत माहिती द्यायला हवी. डिजिटल अरेस्ट किंवा एकूणच सायबर गुन्ह्याविषयी शाळा महाविद्यालयात कार्यशाळा, प्रत्यक्षिके, प्रशिक्षणे, जनजागृती कार्यक्रम आणि प्रचार प्रसार करायला हवा. प्रिंट, इलेक्ट्रॉनिक आणि सोशल मिडियातूनही याबाबत जनजागृती व्हायला हवी. नागरिकांनीही याबाबत सतर्क राहायला हवे. नागरिक सतर्क राहिले तरच सायबर गुन्हेगारांच्या जाळ्यात अडकणार नाही.

- श्याम ठाणेदार

लोकप्रतिनिधींनीची 'असंवेदनशीलता'

ज्यावर दुष्काळ, महागाई, बेरोजगारी यांचे गंभीर सावट आहे, अमृतकाल ऐवजी राज्यात संकटकालासारखी परिस्थिती आहे, जगाचा पोशिंदा असलेला बळीराजाच्या हालाला तर पारावर राहिलेला नाही, शेतकऱ्यांच्या आत्म हत्या थांबायला तयार नाही. ज्या विदर्भातील यवतमाळ जिल्ह्यात ४० वर्षांपुर्वी देशातील पहिली भाऊसाहेब करपे या शेतकऱ्याने आत्म हत्या केली, ज्या विदर्भ, मराठवाड्यात आजही शेतकऱ्यांच्या सर्वाधिक आत्महत्या होत आहे.

त्याच विदर्भातील एक लोकप्रतिनिधीं आत्महत्या करणाऱ्या शेतकऱ्याच्या मयताला देखील जाऊ नका, आपली बॉडी जनावर जेव्हा खातील तेव्हा त्याला कळेल असे ते निर्लज्जपणे म्हणतो हे लोकप्रतिनिधींची असंवेदनशीलता दर्शवतेअशातच ज्या भागात शेतकऱ्यांच्या जास्त आत्महत्या होत आहे त्याच भागातील एक लोकप्रतिनिधीं शेतकऱ्यांच्या आत्म हत्यांबाबत अतिशय संतापजनक वक्तव्य करतो आणि तो देखील सत्ताधारी पक्षाचा हे अतिशय दुर्दैवी आहे. तसेही हे महाशय वादग्रस्त वक्तव्ये वारंवार करत असतात मारकुटे म्हणून देखील हे महाशय ओळखले जातात. या अगोदर त्यांनी राहूल गांधी यांच्या बाबत वक्तव्य करतांना त्यांची जीभ झाटुन आणणाऱ्यास एक लाख रुपयांचे बक्षिस जाहीर केले होते तर कोरोना काळात त्यांनी देवेंद्र फडणवीस यांच्या बाबत देखील अतिशय असमर्थनीय वक्तव्य केले होते. शिवाजी कोत होता.

या पुस्तकाचे प्रकाशक प्रशांत आंबी यांना फोन करून अतिशय अर्वाच्च भाषेत शिवीगाळ या लोकप्रतिनिधींने केली होती तर आमदार निवासातील कँटीन मधे बनियन वर येऊन त्यांनी तेथील कर्मचाऱ्यांवर दबंगगिरी करून आपली मुर्दुमकी दाखवली होती. तसेही हे लोकप्रतिनिधी कधीही सन्मानित लोकप्रतिनिधींसारखे वागत नाही त्यांचा पक्ष देखील त्यांना पाठिशी घालण्यापलिकडे काही करतांना दिसत नाही आता पक्ष अडचणीत आल्यामुळे काही तरी कारवाई होण्याची शक्यता आहे मात्र ती तोंडदेखलेपणाची नसावी तर गांभीर्याने केलेली असावी.

राज्यात दुष्काळाचे गंभीर संकट आहे त्यामुळेच सरकारने दुष्काळ जाहीर करुन शेतकऱ्यांना तातडीने पाच हजार रुपयांची मदत जाहीर केली, चहूबाजूंनी कोंडी झाल्याने दररोज शेतकरी आत्महत्या करत आहेत. अशावेळी लोकप्रतिनिधींनी संवेदनशीलता दाखवण्याऐवजी जनतेच्या जखमेवर मीठ चोळले जात आहे . शेतकऱ्यांवर आत्महत्या करण्याची वेळ कश्याममुळे, कोणामुळे, येते याचा गांभीर्याने विचार होणे गरजेचे असतांना असे वक्तव्य करणे हे दुर्दैवी आहे. लोकप्रतिनिधीं म्हणून आपली जबाबदारी काय आणि आपण करतो काय याचे भान ठेवायला हवे.ऐकिकडे निसर्गाचा कोप तर दुसरीकडे मायबाप सरकार आणि असे लोकप्रतिनिधीं यांची असंवेदनशीलता या कोंडीत बळीराजा आत्महत्येचा मार्ग स्वीकारत आहे हे पुरोगामी महाराष्ट्राला शोभनीय नाही. शेतकऱ्यांच्या आत्महत्यांना शेतकरी नक्कीच जबाबदार नाही आणि जबाबदार कोण असेल तर शासन-प्रशासन व्यवस्था जबाबदार आहे. आता ते कितीही सारवासारव करण्याचा प्रयत्न करत असले तरी शेतकरी जनतेत जो संदेश जायचा तो गेलाच आहे. असे लोकप्रतिनिधीं हे शेतकऱ्यांच्याचे लोकप्रतिनिधींनी असुच शकत नाही.

- अनंत बोरसे
शहापूर जिल्हा ठाणे
९१५८४९५०३७

यंदाच्या दिवाळीला भेसळमुक्त मिठाई खायला मिळणार का ?

दरवर्षी दिवाळी जवळ आली कि राज्याच्या अन्न आणि औषध विभागाकडून ठिकठिकाणी धाडी टाकल्याच्या आणि भेसळयुक्त मिठाई जप्त केल्याच्या बातम्या वृत्तपत्रांतून वाचायला मिळतात, त्यामुळे राज्याचे अन्न आणि औषध प्रशासन केवळ दिवाळीच्या निमित्तानेच कार्यन्वित होते असा भ्रम राज्यातील सामान्य नागरिकांचा झाला होता; मात्र जेव्हापासून या खात्याचा कार्यभार तुकाराम मुंढे यांनी हाती घेतला आहे तेव्हापासून हे खाते २४ तास 'ॲक्टिव्ह' मोडमध्येच आहे.

या खात्याशी संबंध येणाऱ्या राज्यातील समस्त कंपन्यांनी मुंढे यांचा धसका घेतल्याने यंदा दिवाळीत आपल्याला कमीतकमी भेसळ असलेली किंवा शुद्ध मिठाई खायला मिळेल अशी आशा बाळगायला हरकत नाही. 'अन्न आणि औषध प्रशासन विभाग हा राज्यातील १२ कोटींहून अधिक जनतेशी थेट जोडला गेला आहे. त्यामुळे जनतेच्या आरोग्याची काळजी घेणे, हे कर्तव्य असून फाईव्ह स्टार असो वा स्ट्रीट फूड, प्रत्येकाला अन्न सुरक्षा नियमांचे पालन करणे बंधनकारक आहे; मात्र अन्न सुरक्षा नियमांकडे दुर्लक्ष तर कारवाई अटळ, असा थेट इशारा अन्न आणि औषध प्रशासन विभागाचे आयुक्त तुकाराम मुंढे यांनी गणेशोत्सवाच्या आधीच दिला होता.

आता दिवाळीच्या पार्श्वभूमीवर पुन्हा एकदा पत्रकार परिषद घेऊन गोदामे, कारखाने यांसह दुकानदारांनाही त्यांनी सूचित केले आहे.

दिवाळी जवळ आल्याने अन्न आणि औषध प्रशासनाने नुकतीच १०५७ मसाला उत्पादक आस्थापनांची चौकशी केली. या कारवाईत तब्बल १९.६९ कोटी रुपये किमतीचे ११,९६३ क्विंटल मसाले आणि मसालेजन्य पदार्थ जप्त करण्यात आले. नियमांचे उल्लंघन करणाऱ्या ९४ आस्थापनांचे परवाने निलंबित करण्यात आले. ५५७ जणांना सुधारणा नोटिसा बजावण्यात आल्या. गोंदिया शहरातील कुडवा येथील लोहिया वॉर्डातील 'रिफा दूध डेअरी'वर १३ ऑक्टोबरला जिल्हास्तरीय दूध भेसळ प्रतिबंधक समितीच्या पथकाने तपासणी केली. यावेळी अस्वच्छ वातावरणात तयार आणि साठवून ठेवलेले सहस्रो किलो दुग्धजन्य पदार्थ जप्त करून नष्ट करण्यात आले. संभाजी नगरातील बजाज नगरमधील बिकानेर मिठाईच्या दुकानात अन्न आणि औषध प्रशासनाने नुकतीच धाड टाकून भेसळयुक्त आणि नित्कृष्ट दर्जाची मिठाई तसेच अन्य अन्न पदार्थ यांचा सुमारे ६३ किलो साठा जागेवरच नष्ट केला. दुकानाचा परवानाही तात्काळ निलंबित करण्यात आला. नवरात्रीदरम्यान अन्न आणि औषध प्रशासनाने सप्तशृंगी गडावर विशेष तपासणी मोहीम राबवून १३ आस्थापनांवर कारवाई केली ज्यामध्ये ५ लक्ष ६२ सहस्त्र मूल्याची १४०८ किलो मिठाई नष्ट केली. अशाच प्रकारची कारवाई नवरात्रीमध्ये तुळजापूरातही करण्यात आली होती ज्याममध्ये सव्वाचार कोटी रुपये किमतीचा १ लक्ष ९७ सहस्त्र ४८० किलो संशयास्पद साठा जप्त करण्यात आला.

कमी खर्चात अधिक उत्पन्न मिळवण्याच्या लोभाने ही भेसळयुक्त मिठाई बनवली जाते. भेसळयुक्त पेढे किंवा मिठाई खाल्यास घशात खवखव होते, खोकला येतो आणि पोटात दुखते. चक्कर येणे, पोटात मळमळणे , उलटी, जुलाब सुरु होणे यांसारखे परिणाम जाणवू लागतात. काविळसारख्या आजाराची लागण होऊ शकते. किडनी आणि यकृतावरही भेसळयुक्त मिठाईचा गंभीर परिणाम होऊ शकतो. इतकेच नाही, तर विषबाधा अधिक झाल्यास खाणाऱ्याचा मृत्यूही ओढावू शकतो. भेसळयुक्त दुधाचे सेवन केल्यास क्षयरोग होऊ शकतो. कृत्रिम दुधात युरियाची भेसळ असल्यास युरियातील नायट्रोजनमुळे मूत्रपिंड, यकृत आणि हृदय निकामी होऊ शकते. खावा तयार करण्यासाठी वापरण्यात येणारे दूध केमिकलयुक्त असल्याचे अन्न आणि औषध प्रशासनाच्या तपासणीत निष्पन्न झाल्यास भारतीय दंड विधान ३२८ कलमान्वये अजामिनपात्र गुन्हा दाखल करण्यात येतो. मिठाईसाठी वापरण्यात आलेल्या दुधात पाणी आणि दुधाची पावडर मिश्र केल्याचे आढळल्यास २६२ कलमान्वये गुन्हेगारास आर्थिक दंड ठोठावण्यात येतो. असे असूनही प्रतिवर्षी मिठाईत केल्या जाणाऱ्या भेसळीचे प्रमाण कमी न होता त्यांमध्ये वाढच होत आहे. गणेशोत्सव आणि दिवाळीच्या काळात अनेक ठिकाणी भेसळयुक्त मिठाई सर्रासपणे विकली जाते. आर्थिक लाभासाठी पामतेलाचा वापर करून खवा बनवणे. कृत्रिम आणि केमिकलयुक्त दूध तयार करून त्यापासून मिठाई बनवणे यासारखे प्रकार सणासुदीच्या काळात प्रकर्षाने घडतात. स्वतःच्या स्वार्थासाठी लोकांच्या जीवाशी खेळणाऱ्या अशा महाभागांना खरेतर कठोर शिक्षा होणे अपेक्षित आहे; मात्र अनेकदा ही मंडळी कायद्यातील पळवाटांचा लाभ घेऊन निर्दोष सुटतात किंवा जामिनावर बाहेर पडतात. यांना कायद्याचे भय न राहिल्याने दरवर्षी भेसळयुक्त मिठाई बनवून विकणाऱ्यांमध्ये वाढच होताना दिसत आहे.

मिठाई बनवण्यासाठी लागणारा प्रमुख कच्चा माल म्हणजे दूध. या दुधातच प्रतिदिन मोठ्या प्रमाणात भेसळ केली जाते यासंदर्भात प.पू. काडसिद्धेश्वर महाराज यांनी २०२२ साली सांगितलेली माहिती अत्यंत महत्वाची आहे. त्यांनी त्यावेळी सांगितले होते कि प्रतिदिन देशभरात ६५ कोटी लिटर दुधाची गरज भासते. देशभरातील गाई, म्हैशी, शेळ्या आणि उंट यांच्यापासून प्रतिदिन मिळणारे एकूण दूध केवळ १५ कोटी लिटर आहे याचाच अर्थ प्रतिदिन ५० कोटी लिटर दूध हे भेसळ करून बनवले आणि पुरवले जाते. अनेक दूध उत्पादक कंपन्या जेवढे दूध प्राण्यांकडून मिळवतात त्याच्या दुप्पटीने विकतात याचाच अर्थ अधिकचे दूध ते कृत्रिम पद्धतीने बनवतात. देशातील ८० टक्के मिठाई ही नकली दुधापासून तयार केलेल्या खव्यापासून बनवली जाते. भारताला रोज कमी पडणारे ५० कोटी लिटर दूध कसे मिळवता येईल यावर काम केले तर कित्येकांना रोजगार मिळेल. महाराजांनी ४ वर्षांपूर्वी केलेल्या या भाष्यातील आकडेवारी जरी बदलली असली तर प्रमाण हे सारखेच आहे. दूध देणारे स्रोत हे मर्यादित असताना सणांच्या काळात एवढ्या मोठ्या प्रमाणात मिठाई बनते तरी कशी असा आपल्याला प्रश्न पडायला हवा. मिठाईतील अर्थात दुधातील भेसळ हा सर्वसामान्य लोकांच्या आयुष्याशी खेळ आहे आणि तो खेळणारे दरवर्षी लक्षावधी रुपयांचा नफा कमावत असतात. ही भेसळ रोखणे एकट्या तुकाराम मुंढेंचे किंवा अन्न आणि औषध प्रशासनाचेच काम नाही त्यासाठी तुम्ही आम्ही सर्वांनी मिळून संघटितपणे प्रयत्न करायला हवेत. चला तर मग यंदाची दिवाळी भेसळखोरांना धडा शिकवून साजरी करूया !

- जगन घाणेकर, घाटकोपर, मुंबई
संपर्क : ९६६४५५९७८०

पटेलजी

वल्लभभाई पटेलजी
पहिले उप पंतप्रधान
स्वातंत्र्य लढ्यातील
अभूतपूर्व रे योगदान

भारताचे लोह पुरुष
मिळाला उचीत मान
निर्णय क्षमता अपूर्व
नसे नेता तव समान

दारु बंदी अस्पृश्यता
मानले दुश्मनासमान
महिला मुक्तीचा लढा
जागे नारी अभिमान

भारतात केले विलीन
पाचशेबासष्ठ संस्थान
युध्द ना करतां केले
हे अद्भुत कार्य महान

भारतचीन युद्धाबद्दल
अचूक केले अनुमान
लक्ष ना दिले कुणीही
वेळी करुनही निदान

भारतीयअखंडत्वाची
सावरी सक्षम कमान
राष्ट्रीयएकात्मता दिन
जन्म दिना ये सन्मान

स्टॅचू ऑफ युनिटीने
जगता कळे योगदान
जरूर पहावे स्मारक
एकदा तरी ते निदान

- हेमंत मुसरीफ पुणे.
९७३०३०६९९६

सहा.पो.निरीक्षक स्वामी यांच्या मार्गदर्शनाखाली एकता दौडीचे आयोजन

अक्षराज : जफर शेख

दि.३१, बोरी : भारताचे लोहपुरुष, स्वातंत्र्यसेनानी आणि एकीचे शिल्पकार सरदार वल्लभभाई पटेल यांच्या जयंतीनिमित्त बोरी येथे परभणी पोलीस दलाच्या वतीने 'रन फॉर युनिटी' अर्थात एकता दौडीचे आयोजन करण्यात आले. या उपक्रमातून राष्ट्रीय एकात्मता, सामाजिक सलोखा आणि बंधुभावाचा संदेश देण्यात आला.

बोरी पोलीस स्टेशन ते राष्ट्रमाता जिजाऊ उद्यान, बोरीपर्यंत ही एकता दौड काढण्यात आली. सहाय्यक पोलीस निरीक्षक स्वामी यांच्या मार्गदर्शनाखाली हा कार्यक्रम उत्साहात पार पडला. या दौडीत पोलीस अधिकारी, पोलीस

कर्मचारी तसेच पत्रकार बांधवांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. यावेळी सहाय्यक पोलीस निरीक्षक स्वामी, अमोल मुंडे, पोलीस उपनिरीक्षक थोरवे, गायकवाड सर यांच्यासह बोरी पोलीस स्टेशनचे सर्व पोलीस कर्मचारी उपस्थित होते. तसेच परिसरातील सर्व पत्रकार बांधवांनीही या उपक्रमात सहभाग घेतला.

सरदार वल्लभभाई पटेल यांनी देशाच्या एकात्मतेसाठी दिलेले योगदान आणि त्यांचे विचार समाजापर्यंत पोहोचविण्याच्या उद्देशाने या दौडीचे आयोजन करण्यात आले होते. देशाची एकता व अखंडता टिकवून ठेवण्यासाठी प्रत्येक नागरिकाने पुढाकार घ्यावा, असा संदेश यावेळी देण्यात आला. या उपक्रमामुळे बोरी परिसरात देशभक्ती, एकता आणि सामाजिक ऐक्याचे वातावरण निर्माण झाले. 'एक भारत, श्रेष्ठ भारत' या संकल्पनेला बळकटी देणारा हा उपक्रम नागरिकांसाठी प्रेरणादायी ठरला.

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

थोडक्यात बातम्या

'आळंदी नगरपरिषदेची' अनधिकृत नळजोडण्यांविरुद्ध धडक मोहीम

अक्षराज : प्रतिनिधी

दि.३१, आळंदी (पुणे) : आळंदी नगरपरिषदेच्या पाणीपुरवठा विभागामार्फत शहरातील अनधिकृत नळजोडण्यांविरोधात विशेष मोहीम राबविण्यात येत असून, दि. २७ ते ३१ ऑक्टोबर २०२६ या पाच दिवसांच्या कालावधीत प्रभावी कारवाई करण्यात आली आहे. या मोहिमेद्वारे अनधिकृत नळजोडण्यांवर कारवाई करण्यासोबतच नगरपरिषदेच्या महसुलात वाढ करण्यावर भर देण्यात येत आहे.

या कालावधीत ३३ अनधिकृत नळजोडण्या नियमानुसार अधिकृत करण्यात आल्या असून, ४० अनधिकृत नळजोडण्या बंद करण्यात आल्या आहेत. तसेच, नगरपरिषद हद्दीबाहेरील १८ नळजोडण्या अधिकृत करण्यात आल्या आहेत.

या विशेष मोहिमेदरम्यान अनधिकृत नळजोडण्यांचे शुल्क आणि नियमित पाणीपट्टी यांमधून एकूण रु. ३,५९,०५६/- इतकी वसुली करण्यात आली आहे.

शहरातील पाणीपुरवठा व्यवस्था अधिक सक्षम करणे, पाण्याचा अनधिकृत वापर रोखणे, सर्व नळजोडण्या नियमानुसार करणे आणि नगरपरिषदेच्या महसुलात वाढ करणे, या उद्देशाने ही मोहीम राबविण्यात येत आहे. सदर वसुली मोहीम अद्याप सुरू असून, पुढील काळातही अनधिकृत नळजोडण्यांची तपासणी करून नियमानुसार कारवाई करण्यात येणार आहे.

नागरिकांनी आपली नळजोडणी अधिकृत करून घ्यावी, थकीत पाणीपट्टी भरावी आणि नगरपरिषदेच्या पाणीपुरवठा विभागाला सहकार्य करावे, असे आवाहन आळंदी नगरपरिषदेच्या वतीने करण्यात येत आहे.

शेखर भडांगे एमबीबीएस शिक्षणासाठी रशियाला रवाना



अक्षराज : सुनील क्षिरसागर

दि.३१, विंचूर (नाशिक) : विष्णुनगर (विंचूर) येथील प्रसिद्ध पत्रकार राजेश भडांगे यांचे चिरंजीव शेखर भडांगे हे वैद्यकीय क्षेत्रात आपले करिअर घडविण्याच्या उद्देशाने एमबीबीएस (चइइड) उच्च शिक्षणासाठी रशियाकडे रवाना झाले आहेत. त्यांच्या या उल्लेखनीय यशाने भडांगे कुटुंबीयांसह संपूर्ण विंचूर परिसरात आनंदाचे व अभिम ानाचे वातावरण निर्माण झाले असून, विविध क्षेत्रांतील मान्यवरांकडून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

आजच्या स्पर्धात्मक युगात परदेशात जाऊन वैद्यकीय शिक्षण घेणे हे अनेकांचे स्वप्न असते. मात्र, या स्वप्नपूर्तीसाठी दृढ जिद्द, कठोर मेहनत, चिकाटी आणि पालकांचे खंबीर प्रोत्साहन अत्यंत गरजेचे असते. पत्रकार राजेश भडांगे यांच्या चिरंजीवांनी एमबीबीएस शिक्षणासाठी रशियाची निवड करत आपल्या उज्ज्वल भविष्याच्या दिशेने एक महत्त्वपूर्ण पाऊल टाकले आहे. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांनीही अशाच प्रकारे जागतिक स्तरावर शिक्षणाच्या नवनवीन संधी शोधून मोठी भरारी घ्यावी, याचे हे एक उत्तम व प्रेरणादायी उदाहरण ठरले आहे. त्यांच्या या उच्च शैक्षणिक प्रवासामुळे विंचूर आणि परिसरातील इतर विद्यार्थ्यांनाही नक्कीच मोठी प्रेरणा मिळणार आहे.

पत्रकार राजेश भडांगे यांनी आपल्या प्रदीर्घ पत्रकारितेच्या माध्यमातून नेहमीच सम ाजातील विविध प्रश्न व समस्यांना वाचा फोडण्याचे महत्त्वपूर्ण सामाजिक कार्य केले आहे. आता त्यांच्या सुपुत्रानेही वैद्यकीय शिक्षणाच्या माध्यमातून कुटुंबाचा आणि आपल्या गावाचा नावलौकिक आंतरराष्ट्रीय पातळीवर पोहोचविण्याच्या दिशेने वाटचाल सुरू केली आहे.

रद्दीतून फुलणार दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांच्या घरात दिवाळी

अक्षराज : साहेबराव परबत

दि.३१, सोलापूर : एरवी घरात अडगळ म्हणून पडून राहणारी जुनी वर्तमानपत्रे, रद्दी आणि निरुपयोगी वस्तू एखाद्याच्या आयुष्यात आनंदाची नवी पहाट घेऊन येऊ शकतात, याचा प्रत्यय सोलापुरातील सजग युवकांच्या 'रद्दीतून सिद्धी' या अनोख्या उपक्रमातून येत आहे. गेल्या पाच वर्षांपासून सामाजिक बांधिलकी जपत राबविण्यात येणाऱ्या या उपक्रमाचे यंदा सहावे वर्ष असून, यंदा दुष्काळाच्या संकटाने होरपळलेल्या शेतकरी कुटुंबांच्या चेहऱ्यावर दिवाळीचा आनंद फुलविण्याचा संकल्प युवकांनी केला आहे.

दोन वेळच्या जेवणाची भ्रांत असलेल्या गरीब, गरजू व बेघर नागरिकांना तसेच त्यांच्या लहान मुला-मुलींना दिवाळीचा आनंद घेता यावा, या उद्देशाने या उपक्रमाची सुरुवात करण्यात आली. आतापर्यंत या माध्यमातून गरजूंची दिवाळी गोड करण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. यंदा मात्र अस्मानी संकटाचा सामना करणाऱ्या दुष्काळग्रस्त शेतकरी कुटुंबांनाही या आनंदात सहभागी करून घेण्याचा निर्धार युवकांनी केला आहे.

यासाठी सोलापूर शहरातील नागरिकांनी आपल्या घरातील जुनी वर्तमानपत्रे, रद्दी, वापरात नसलेल्या वस्तू व साहित्य तसेच आर्थिक स्वरूपात योगदान द्यावे, असे आवाहन युवा सामाजिक कार्यकर्ते तुषार आवताडे यांनी केले आहे. शनिवार, दि. ७ नोव्हेंबर २०२६ पर्यंत हे साहित्य जमा करता येणार आहे. याशिवाय घरगुती फराळातील लाडू, चिवडा, करंजी, अनारसे यांसारखे पदार्थही देणगी स्वरूपात स्वीकारले जाणार आहेत.

जमा झालेली रद्दी व निरुपयोगी साहित्य विक्रीतून मिळणाऱ्या रकमेतून दुष्काळग्रस्त शेतकरी कुटुंबांची दिवाळी गोड करण्यात येणार आहे. शेतकरी कुटुंबांना फराळाचे वाटप करण्याबरोबरच त्यांच्या लहान मुला-मुलींना नवीन कपडे देऊन त्यांच्या चेहऱ्यावर आनंद फुलविण्याचा प्रयत्न या युवक-युवतींकडून केला जाणार आहे. समाजातील प्रत्येक घटकाने आपापल्या परीने हातभार लावल्यास अनेक कुटुंबांची दिवाळी आनंदात साजरी होऊ शकते, हा संदेश या उपक्रमातून दिला जात आहे.

लातूरमध्ये 3 हजार ५०० रुपयांची लाच घेताना ग्रामसेविका एसीबीच्या जाळ्यात

खरेदीखताच्या नोंदीसाठी लाचेची मागणी; पंचायत समितीच्या आवारातील कॅन्टीनमध्ये रंगेहात पकडले

अक्षराज : आदित्य चिकटे

दि.३१, अहमदपूर : शासकीय कामासाठी नागरिकांकडे लाचेची मागणी करणाऱ्यांविरोधात लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने पुन्हा एकदा कारवाईचा बडगा उगारला आहे. घराच्या खरेदीखताची ग्रामपंचायत दप्तरी नोंद करण्यासाठी ३ हजार ५०० रुपयांची लाच स्वीकारल्याच्या आरोपावरून कासारगाव येथील ग्रामपंचायत अधिकारी तथा ग्रामसेविका ढोबळे यांना लातूर एसीबीच्या पथकाने रंगेहात पकडले. लातूर पंचायत समितीच्या आवारातील कॅन्टीनमध्ये ही कारवाई करण्यात आली. या घटनेमुळे प्रशासकीय वर्तुळात खळबळ उडाली आहे.

नेमके प्रकरण काय?

मिळालेल्या माहितीनुसार, तक्रारदाराने लातूर तालुक्यातील कासारगाव येथील गट क्रमांक ३३१ मधील प्लॉट क्रमांक १२ च्या दक्षिण भागातील घर खरेदी केले होते. या घराच्या खरेदीखताची ग्रामपंचायत कार्यालयात नोंद करण्यासाठी त्यांनी अर्ज केला होता. मात्र, संबंधित नोंद करण्यासाठी ग्रामसेविका ढोबळे यांनी ३ हजार ५०० रुपयांच्या लाचेची मागणी केल्याचा आरोप आहे.

या प्रकारामुळे तक्रारदाराने लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या लातूर कार्यालयाकडे धाव घेत

तक्रार दाखल केली. तक्रारीची दखल घेत एसीबीच्या पथकाने पुढील कारवाई सुरू केली.

पंचांसमक्ष पडताळणी अन् सापळा !

२८ ऑक्टोबर २०२६ रोजी पंचांसमक्ष लाचेच्या मागणीची पडताळणी करण्यात आली. या पडताळणीदरम्यान संबंधित महिलेने ३ हजार ५०० रुपये स्वीकारण्यास संमती दर्शविल्याचे एसीबीच्या माहितीत नमूद आहे. त्यानंतर पथकाने नियोजनपूर्वक सापळा रचला.

लातूर पंचायत समितीच्या आवारातील कॅन्टीनमध्ये तक्रारदाराकडून लाचेची रक्कम स्वीकारताना संबंधित ग्रामसेविकेला पथकाने रंगेहात पकडले. या प्रकरणी लातूर येथील शिवाजीनगर पोलीस ठाण्यात भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम १९८८ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

पुढील तपास सुरु

या प्रकरणाचा पुढील तपास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, लातूरचे पोलीस निरीक्षक संजय केसरे करीत आहेत. शासकीय कामे नियमानुसार आणि पारदर्शक पद्धतीने होणे अपेक्षित असताना अशा प्रकारच्या तक्रारी समोर येणे ही चिंतेची बाब मानली जात आहे.

लाचेची मागणी झाल्यास १०६४ वर संपर्क साधा !

शासकीय अधिकारी किंवा कर्मचारी कोणतेही शासकीय काम करून देण्यासाठी लाचेची मागणी करीत असल्यास नागरिकांनी घाबरून न जाता लाचलुचपत प्रतिबंधक विभागाशी संपर्क साधावा. यासाठी टोल फ्री क्रमांक १०६४ उपलब्ध आहे.

लाचलुचपत प्रतिबंधक विभागाचे पोलीस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे, अपर पोलीस अधीक्षक डॉ. अश्विनी जगताप आणि पोलीस उपअधीक्षक चंद्रकांत सिदराम माळी यांनी नागरिकांना भ्रष्टाचारासंदर्भात तक्रार करण्याचे आवाहन केले आहे.

शासकीय सेवा हा नागरिकांचा अधिकार आहे; लाच देणे किंवा घेणे हा कायद्याने दंडनीय गुन्हा आहे. भ्रष्टाचाराविरोधात नागरिकांनी जागरूक राहून पुढे येणे गरजेचे आहे.

देवीभोयरे फाटा-खडकी रस्त्याच्या कामात हलगर्जी नको; DPR नुसारच काम करा

अन्यथा ठेकेदार, इंजिनिअर व अधिकाऱ्यांवर कारवाई करा - काँग्रेस नेते रविश रासकर यांची मागणी

अक्षराज : वसंत रांधवण

दि.३१, पारनेर (अहिल्यानगर) : देवीभोयरे फाटा - सुपा - सारोळा - खडकी रस्ता राज्य महामार्ग क्रमांक ६९ कि.मी. ०/०० ते ४८/००, या संपूर्ण लांबीसाठी मंजूर डीपीआर, तांत्रिक मान्यता व अंदाजपत्रकानुसार काम करण्यात यावे. यामध्ये त्रुटी आढळल्यास संबंधित ठेकेदार इंजिनिअर व अधिकाऱ्यांवर कारवाई करावी, अशी मागणी काँग्रेस नेते रविश रासकर यांनी केली आहे.

याबाबत रासकर यांनी सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांना निवेदन दिले आहे. मंजूर अंदाजपत्रक, तांत्रिक मान्यता, आराखडे, गुणवत्ता नियंत्रणाची कार्य पद्धती व लागू तांत्रिक निर्देशानुसार कामाची अंमलबजावणी करावी, कामाची गुणवत्ता समाधानकारक नसल्यास किंवा मंजूर तांत्रिक निकषांचे उल्लंघन आढळल्यास संबंधित नियमानुसार दुरुस्ती जबाबदारी निश्चित

करणे व प्रशासकीय ठेकेदारांवर आणि अधिकाऱ्यांवर कारवाई करावी अशी मागणी रासकर यांनी केली. यावेळी काँग्रेस तालुका उपाध्यक्ष रामकृष्ण पवार, युवा नेते प्रविण दळवी यांच्यासह पदाधिकारी उपस्थित होते.

दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर चारठाणा गणातील गावांना टँकरने पाणीपुरवठा करण्याची प्रक्रिया सुरू

ग्रामविकास अधिकाऱ्यांनी तातडीने ठराव घ्यावेत – जिल्हा परिषद सदस्य जाधव यांचे आवाहन

अक्षराज : अलीम शेख

दि.३१, चारठाणा (परभणी) : परिसरात निर्माण झालेली दुष्काळसदृश परिस्थिती आणि पिण्याच्या पाण्याची वाढती टंचाई लक्षात घेता चारठाणा गणातील सर्व गावांना टँकरद्वारे पाणीपुरवठा सुरू करण्यासाठी प्रशासकीय हालचालींना वेग आला आहे. या संदर्भात जिल्हा परिषद सदस्य शंकर भाऊ जाधव यांनी दिनांक १९ ऑक्टोबर २०२६ रोजी पंचायत समिती जिंतूरचे गटविकास अधिकारी यांच्याकडे निवेदन सादर केले होते.

या निवेदनाची दखल घेत गटविकास अधिकाऱ्यांनी चारठाणा गणातील संबंधित ग्रामविकास अधिकाऱ्यांना टँकरद्वारे पाणीपुरवठा करण्याच्या अनुषंगाने आवश्यक कार्यवाही करण्याबाबत पत्र काढले आहे.दुष्काळी परिस्थितीम ुळे ग्रामीण भागातील नागरिकांना पिण्याच्या पाण्यासाठी मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. अनेक गावांमध्ये पाण्याची उपलब्धता कमी होत असल्याने नागरिकांना पाण्यासाठी धावपळ करावी लागत आहे. विशेषतः महिला, ज्येष्ठ नागरिक आणि लहान मुलांना पाणी मिळवण्यासाठी म ोठ्या त्रासाला सामोरे जावे लागत आहे. त्यामुळे नागरिकांना वेळेवर आणि पुरेशा प्रमाणात पिण्याचे पाणी उपलब्ध करून देणे अत्यंत गरजेचे झाले आहे.या पार्श्वभूमीवर जिल्हा परिषद सदस्य शंकर भाऊ जाधव यांनी पुढाकार घेत प्रशासनाकडे टँकरद्वारे पाणीपुरवठा सुरू करण्याची मागणी केली. त्यांच्या निवेदनानंतर गटविकास अधिकारी, पंचायत समिती जिंतूर यांनी चारठाणा गणातील सर्व संबंधित ग्रामविकास अधिकाऱ्यांना

आवश्यक कार्यवाही करण्यासाठी पत्र दिले आहे.

ग्रामविकास अधिकाऱ्यांनी तातडीने ठराव घ्यावेत!

चारठाणा गणातील सर्व गावांच्या ग्रामविकास अधिकाऱ्यांनी आपल्या गावातील पिण्याच्या पाण्याची सद्यस्थिती लक्षात घेऊन ग्रामपंचायतीच्या माध्यमातून तातडीने आवश्यक ठराव घ्यावेत. हे ठराव गटविकास अधिकारी, पंचायत समिती जिंतूर किंवा जिल्हा परिषद सदस्य शंकर भाऊ जाधव यांच्याकडे लवकरात लवकर सादर करावेत, असे आवाहन करण्यात आले आहे.

गावातील पाणीटंचाईची वस्तुस्थिती प्रशासनासमोर मांडण्यासाठी ग्रामपंचायतींचे ठराव महत्त्वाचे ठरणार आहेत. त्यामुळे संबंधित ग्रामविकास अधिकाऱ्यांनी या विषयाकडे गांभीर्याने लक्ष देऊन विलंब न करता आवश्यक कागदपत्रांची पूर्तता करणे गरजेचे आहे.

नागरिकांना दिलासा मिळण्याची अपेक्षा

पिण्याचे पाणी ही नागरिकांची मूलभूत गरज असून, दुष्काळी परिस्थितीत नागरिकांना पाण्यासाठी वणवण करावी लागू नये, यासाठी प्रशासनाने योग्य नियोजन करणे आवश्यक आहे. टँकर सुरू करण्याची प्रक्रिया वेळेत पूर्ण झाल्यास पाणीटंचाईचा सामना करणाऱ्या गावांतील नागरिकांना मोठा दिलासा मिळू शकतो.

ग्रामपंचायतींचे ठराव वेळेत प्राप्त झाल्यानंतर संबंधित प्रशासनाकडून पुढील कार्यवाही होण्यास मदत होईल. त्यामुळे चारठाणा गणातील प्रत्येक गावाने आपल्या पाणीटंचाईच्या परिस्थितीचा आढावा घेऊन आवश्यक प्रस्ताव तातडीने सादर करावेत. चारठाणा गणातील एका ही गावाला पिण्याच्या पाण्याअभावी त्रास सहन करावा लागू नये, यासाठी सर्व संबंधित ग्रामपंचायती, ग्रामविकास अधिकारी आणि प्रशासनाने समन्वयाने काम करावे, असे आवाहन जिल्हा परिषद सदस्य शंकर भाऊ जाधव यांनी केले आहे.

पथनाट्याव्दारे स्वच्छतेविषयी जनजागृती व लोकहभागातून सखोल स्वच्छता मोहीमा

दि.३१, जुहूगाव : स्वच्छतेच्या दृष्टीने सजगता राखत दैनंदिन स्वच्छतेप्रमाणेच विविध भागांमध्ये स्वच्छता मोहीमा राबविण्याकडेही नियमित लक्ष दिले जात असून त्यामध्ये लोकसहभाग असावा यावरही भर दिला जात आहे. अशीच सखोल स्वच्छता मोहीम आज वाशी येथील जुहूगाव चौपाटी मिनी सी शोअर भागात राबविण्यात आली. यामध्ये वाशीच्या फादर ॲग्नेल महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी पुढाकार घेत म हापालिका कर्मचारी आणि स्वच्छताकर्मींच्या सहयोगाने हा भाग स्वच्छ केला.

सखोल स्वच्छता मोहीमांप्रमाणेच घनकचरा व्यवस्थापन

नियम २०२६ च्या अंमलबजावणीच्या अनुषंगाने नागरिकांम ध्ये दैनंदिन निर्माण होणा-या कच-याचे ४ प्रकारे वर्गीकरण करणे, एकल वापर प्लास्टिकला दैनंदिन वापरातून हद्दपार करणे अशा स्वच्छताविषयक विविध बाबीवर जनजागृती करण्यात येत आहे. याकरिता पथनाट्यासारख्या जनमानसात लोकप्रिय माध्यमाचा प्रभावी वापर केला जात असून आज पथनाट्याच्या कलावंत समुहाने वाशी रेल्वे स्टेशन तसेच वाशी विभागात वर्दळीच्या ठिकाणी पथनाट्ये सादर करून स्वच्छताविषयक जनजागृती केली. अशाच प्रकारच्या मोहीमा व जनजागृती स्थानिक पातळीवर नागरिकांपर्यंत विविध माध्यमांतून पोहोचून केली जात असून स्वच्छ नवी मुंबई मिशन राबविताना त्यामध्ये नागरिक सहभागावर भर देण्यात येत आहे.

इरई धरणातील पाणीसाठ्याचे सूक्ष्म नियोजन करा, शेवटच्या नागरिकापर्यंत पाणी पोहोचवा : आ. जोरगेवार

जिल्हाधिकारी वसुमना पंत यांच्यासह इरई धरणाची पाहणी

अक्षराज : वसंत वडस्कर

दि.३१, चंद्रपूर : चंद्रपूर जिल्ह्यात निर्माण झालेली दुष्काळी परिस्थिती लक्षात घेता उपलब्ध पाणीसाठ्याचे योग्य नियोजन करून त्याचा काटेकोर वापर करणे आवश्यक आहे. आगामी काळातील पाण्याची गरज लक्षात घेऊन उपलब्ध पाण्याचे सूक्ष्म नियोजन करावे. कोणत्याही परिस्थितीत पाण्याचा अपव्यय होणार नाही. शेवटच्या नागरिकापर्यंत पाणी पोहोचेल, याची दक्षता प्रशासनाने घ्यावी, असे निर्देश आ. किशोर जोरगेवार यांनी दिले. जिल्हाधिकारी वसुमना पंत यांच्यासह त्यांनी इरई धरणाची पाहणी करून उपलब्ध पाणीसाठ्याचा आढावा घेतला.

यावेळी मनपा आयुक्त नरेश अकुनरी, मुख्य अभियंता चंद्रपूर थर्मल पॉंवर स्टेशन अनिल काथोये, उपविभागीय अधिकारी विशाल कुमार मेश्राम, उपायुक्त मनपा शेषराव टाले, तहसीलदार विजय पवार, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी सलीम शेख, कार्यकारी अभियंता चंद्रपूर पाटबंधारे विभाग जलेश सिंग, कार्यकारी अभियंता महेश गवरी, शहर अभियंता मनपा रवींद्र हजारे यांच्यासह इतर अधिकार्यांची उपस्थिती होती. तसेच यावेळी भाजपचे माजी महानगर अध्यक्ष तथा नगरसेवक सुभाष कासनगोट्टूवार, भाजपा राष्ट्रीय कार्यकारणी सदस्य प्रकाश देवतळे, भाजपा महामंत्री नामदेव डाहुले, रविंद्र गुरनुले, मनोज पाल, गटनेते शेखर शेट्टी, जितेश कुळमेथे, बलराम डोडानी, तुषार सोम, दशरथ सिंग ठाकूर, अमोल शेंडे, प्रलय म्हशाखेत्री, प्रवीण गिलबिले यांच्या ६ कार्यकर्त्यांची उपस्थिती होती.

यावेळी धरणातील सद्यस्थितीतील पाणीसाठा, पाण्याची उपलब्धता, आगामी काळातील संभाव्य गरज आणि पाणी वितरणाच्या नियोजनाबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली. जिल्ह्यातील दुष्काळी परिस्थिती पाहता पाण्याचे नियोजन करताना प्रत्येक बाबीचा गांभीर्याने विचार करणे गरजेचे आहे. उपलब्ध पाणीसाठा किती दिवस पुरू शकेल, विविध क्षेत्रांसाठी किती पाण्याची आवश्यकता आहे आणि त्यानुसार वितरण कसे करावे, याचे स्पष्ट नियोजन प्रशासनाने तयार करावे. पाणीपुरवठ्याच्या नियोजनात कोणत्याही भागावर अन्याय होणार नाही, याचीही दक्षता घेण्याच्या सूचना आ. जोरगेवार यांनी यावेळी केल्या.

केवळ धरणातील उपलब्ध पाण्यावर अवलंबून न राहता इतर जलस्रोतांचे पुनरुज्जीवन करण्यासाठीही विशेष प्रयत्न होणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले. अनेक ठिकाणी पाण्याचे नैसर्गिक स्रोत असूनही योग्य देखभाल आणि संवर्धनाअभावी ते निष्क्रिय झाले आहेत. अशा जलस्रोतांची ओळख करून त्यांना पुन्हा प्रवाहित करण्यासाठी आवश्यक कामे हाती घ्यावीत. नद्या, नाले आणि ओढ्यांमधील पाणी अडवून त्याचा साठा वाढविण्यासाठी प्रभावी उपाययोजना कराव्यात, अश्या सुचनाही यावेळी आ. किशोर जोरगेवार यांनी प्रशासनाला केल्या आहे.

जिल्ह्यात ज्या ठिकाणी बंधारे बांधणे शक्य आहे, त्या ठिकाणांची पाहणी करून बंधाऱ्यांच्या उभारणीचे नियोजन करावे. शक्य तिथे बंधारा या भूमिकेतून पावसाचे वाहून जाणारे पाणी अडविण्याला प्राधान्य द्यावे. यामुळे भूजलपातळी वाढण्यास मदत होण्यासोबतच भविष्यातील पाणीटंचाईवर मात करण्यासाठी ही हातभार लागेल. यासोबतच पाणीपुरवठा करणाऱ्या जलवाहिन्यांमधील गळती शोधून ती तातडीने दुरुस्त करावी. वितरण व्यवस्थेतील पाण्याचे नुकसान कमी करून उपलब्ध पाण्याचा अधिकाधिक उपयोग नागरिकांसाठी करता येईल, अशा उपाययोजना करण्याचे निर्देश त्यांनी दिले.

इरई धरणातून होणारी वीजनिर्मिती आणि नागरिकांच्या पिण्याच्या पाण्याची गरज या दोन्ही बाबी महत्त्वाच्या आहेत. त्यामुळे वीजनिर्मिती प्रक्रियेला बाधा न आणता पिण्याच्या पाण्याच्या गरजेचा समतोल राखणारे नियोजन करण्यात यावे. यासाठी संबंधित विभागांनी एकमेकांशी समन्वय साधून निर्णय घ्यावेत. पाणी वितरण करताना शेवटच्या टोकावरील वस्त्यांपर्यंत नियमित आणि पुरेसा पाणीपुरवठा होईल, याची खबरदारी घ्यावी, असे आ. जोरगेवार यांनी स्पष्ट केले.

दुष्काळी परिस्थितीत पाण्याचा प्रश्न अधिक गंभीर होण्याची शक्यता लक्षात घेता प्रशासनाने आतापासूनच आवश्यक खबरदारी घेणे गरजेचे आहे.

खापरखेडा येथे 'राष्ट्रीय एकता दिन' उत्साहात; खापरखेडा पोलिसांतर्फे भव्य 'एकता दौड' संपन्न

अक्षराज : दिवाकर घेर

दि.३१, नागपूर : लोहपुरुष सरदार वल्लभभाई पटेल यांच्या १५१ व्या जयंतीनिमित्त आणि राष्ट्रीय एकता दिनाचे औचित्य साधून खापरखेडा पोलीस ठाण्याच्या वतीने भव्य एकता दौडचे आयोजन ३१ ऑक्टोबर ला करण्यात आले होते.

या उपक्रमात परिसरातील विविध शाळांमधील शेकडो विद्यार्थी, क्रीडा शिक्षक, पत्रकार, सामाजिक कार्यकर्ते आणि स्थानिक नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून राष्ट्रीय एकात्मतेचा जयघोष केला.

एकता दौड कार्यक्रमात शंकरराव चव्हाण विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय, शंकरराव चव्हाण इंग्लिश स्कूल, सेंट ॲन्स इंग्लिश मीडियम स्कूल व हसनूर कॉन्व्हेंट आदी शाळांचा सहभाग नोंदविला होता. सकाळी ७ वरिष्ठ पोलीस निरीक्षक संदीप बुवा यांच्या मार्गदर्शनाखाली एकता दौड सुरू करण्यात आली. पोलीस ठाणे, अण्णा मोड, आदी परिसरातून भ्रमण करून खापरखेडा पोलीस ठाण्यात एकता दौड संपन्न झाली.

यावेळी पोलिसांनी चोख बंदोबस्त होत याप्रसंगी एकता दौड मार्गावर पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करण्यात आली होती. शिवाय एकता दौड मध्ये भाग घेणाऱ्या शेकडो विद्यार्थ्यांसाठी अल्पोपहाराची व्यवस्था करण्यात आली होती.

> लोहपुरुष सरदार वल्लभभाई पटेल यांनी विविधतेने नटलेल्या संपूर्ण देशाला एकात्मतेच्या सूत्रात बांधून अखंड भारताची निर्मिती केली एकता दौडच्या माध्यमातून तरुण पिढीमध्ये राष्ट्रीय एकात्मता, बंधुभाव, सामाजिक समरसता आणि निरोगी आरोग्याची भावना वृद्धिंगत व्हावी, हाच या उपक्रमाचा मुख्य उद्देश आहे. विद्यार्थ्यांचा आणि नागरिकांचा हा उत्स्फूर्त प्रतिसाद खरोखरच कौतुकास्पद आहे.
> **– संदीप बुवा (वरिष्ठ पोलीस निरीक्षक, खापरखेडा)**

याप्रसंगी वरिष्ठ पोलीस निरीक्षक संदीप बुवा, पोलीस उपनिरीक्षक अजिंक्य कदम, विलास करंगामी, मारोती जगींलवाड, प्रियंका पाटील, मुख्याध्यापक गणेश चिखले, प्राध्यापक चंद्रकांत गायकवाड, सचिन कोरडे, समीर नागदिवे, राहुल तिवारी, क्रीष्णा यादव, सुनील जालंदर, कपिल वानखेडे, अभय मिश्रा, मयूर तिरपुडे, केशव पानतावणे, वीरेंद्र भारद्वाज, क्रिडा शिक्षक खुशाल इंगोले, मनीष पाटील, शुभम गायकवाड यांच्यासह पोलीस कर्मचारी व नागरिक उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी मन्सूर अहमद, सुभाष बेलेकर, संदीप सगने, राजू भोयर, अमित खोब्रागडे, दीपाली मोहड, सुप्रिया पाटील, सुषमा ढोरे आदींनी प्रयत्न केले,

भरधाव ट्रकच्या धडकेत २२ वर्षीय नातवाचा जागीच मृत्यू, आजी गंभीर जखमी

अक्षराज : दिवाकर घेर

दि.३१, नागपूर : नागपूर जिल्ह्यातील सावनेर तालुक्याच्या दहेगाव (रंगारी) ते खापरखेडा मार्गावरील सब्बलनाला परिसरात दिनांक ३१ ऑक्टोबर रोजी सायंकाळी ५.३० च्या सुमारास भरधाव ट्रकने ज्युपिटर दुचाकीला मागून जोरदार धडक दिल्याने झालेल्या भीषण अपघातात दुचाकी चालक नातू घटनास्थळीच मृत्यू झाला असून मागे बसलेली आजी गंभीर जखमी झाली आहे.

ऋषिकेश कवडू वंजाळ (२२) वलनी वस्ती असे मृतक तरुणाचे नाव असून, चिमाबाई वंजाळ असे गंभीर जखमी आजीचे नाव आहे. ऋषिकेश हा आई वडिलांना एकुलता एक मुलगा होता. नागपूर येथील मॅक्स या खाजगी रुग्णालयात ऋषिकेश नोकरी करून आपल्या कुटुंबाचा गाडा चालवत होता.काही दिवसांपूर्वीच नवीन ज्युपिटर दुचाकी घेतली होती. गाडीला नंबरही मिळाला नव्हता. शनिवारी कामाच्या निमित्ताने तो आपल्या आजीला सोबत घेऊन वलनी वस्ती वरून दहेगाव (रंगारी) मार्गे खापरखेड्याकडे येत होता. दरम्यान, सब्बलनाला परिसरात पाठीमागून भरधाव वेगाने येणाऱ्या ट्रकने क्रमांक एमएच-४०-सीए-७८७३ ज्युपिटर दुचाकीला भीषण धडक दिली. यावेळी ऋषिकेश व त्याची आजी चिमाबाई रस्त्यावर पडले. सदर घटनेत ऋषिकेश चा घटनास्थळीच मृत्यू झाला तर आजी चिमाबाई गंभीर जखमी झाल्या यावेळी ट्रकचालक घटनास्थळावरून पसार झाला. घटनेची माहिती खापरखेडा पोलिसांना देण्यात आली पोलिसांनी घटनास्थळ गाठून पंचनामा केला व ऋषिकेशचा मृतदेह शवविच्छेदनासाठी हलविला. जखमी आजीला तातडीने खाजगी रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. ऋषिकेश हा मनमिळाऊ, कष्टाळू व आई-वडिलांचा एकमेव आधार होता. एकुलता एक तरुण मुलगा डोळ्यांदेखत अचानक गेल्याचे समजताच आई-वडिलांनी एकच हंबरडा फोडला याप्रकरणी खापरखेडा पोलिसांनी गुन्हा दाखल केला असून पसार झालेल्या ट्रकचालकाचा कसून शोध सुरू आहे.

आदिवासी समाजासाठी अभिमानाची बातमी; डॉ. कृष्णा पराड यांना मुंबई विद्यापीठाची पीएच.डी.

अक्षराज : सुनिल फर्डे

दि.३१, शहापूर (ठाणे) : आदिवासी समाजातील विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गुणवत्तेत सुधारणा घडवून आणण्याच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण संशोधन करणारे मुंबई विद्यापीठाचे उपकुलसचिव डॉ. कृष्णा अर्जुन पराड यांना मुंबई विद्यापीठाकडून पीएच.डी. (विद्यावाचस्पती) पदवी प्रदान करण्यात आली आहे. त्यांच्या या उल्लेखनीय शैक्षणिक यशामुळे आदिवासी समाजाच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला असून, त्यांच्या यशाचे सर्व स्तरांतून कौतुक होत आहे. डॉ. कृष्णा अर्जुन पराड हे मूळचे ठाणे जिल्ह्यातील भिवंडी तालुक्यातील डोहोळे गावचे रहिवासी असून, सध्या ते कल्याण येथे वास्तव्यास आहेत. आदिवासी समाजातून पुढे येत त्यांनी शैक्षणिक क्षेत्रात मिळवलेले हे यश अनेकांसाठी प्रेरणादायी ठरत आहे.डॉ. पराड यांनी ग्रामीण विकास या विषयांतर्गत आदिवासी शिक्षणातील दर्जात्मक गुणवत्ता सुधारणेसाठी ठाणे जिल्ह्यातील आश्रमशाळांचे मूल्यांकन या महत्त्वपूर्ण विषयावर संशोधनप्रबंध सादर केला. प्रा. (डॉ.) कुणाल जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली मुंबई विद्यापीठाच्या आजीवन अध्ययन आणि विस्तार विभागाच्या संशोधन केंद्रामार्फत त्यांनी हे संशोधन पूर्ण केले. ठाणे जिल्ह्यातील आश्रमशाळांची शैक्षणिक गुणवत्ता, आदिवासी विद्यार्थ्यांच्या शिक्षणाचा दर्जा आणि त्यात सुधारणा करण्याच्या दृष्टीने या संशोधनाला विशेष महत्त्व आहे. डॉ. कृष्णा पराड हे सध्या मुंबई विद्यापीठात उपकुलसचिव म्हणून कार्यरत आहेत. त्यांच्या प्रशासकीय कार्याची दखल घेत विद्यापीठाने त्यांना सन २०१४ मध्ये 'उत्कृष्ट अधिकारी' पुरस्काराने गौरविले होते. शैक्षणिक पात्रता, प्रशासकीय अनुभव आणि सामाजिक बांधिलकी यांचा संगम त्यांच्या कार्यातून दिसून येतो.शैक्षणिक क्षेत्रासोबतच सामाजिक क्षेत्रातही डॉ. पराड यांनी उल्लेखनीय योगदान दिले आहे. आदिवासी समाजाच्या विकासासाठी आणि वंचित घटकांच्या उन्नतीसाठी ते विविध उपक्रमांमध्ये सक्रिय आहेत. त्यांच्या कार्याची दखल घेत गोवा सरकारकडून त्यांना 'आदिवासी समाजभूषण' पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे. तसेच ते विविध आदिवासी आणि मागासवर्गीय संघटनांमध्ये सक्रियपणे कार्यरत आहेत.पीएच.डी. पदवी प्राप्त केल्यानंतर डॉ. कृष्णा पराड यांनी मुंबई विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. (डॉ.) रवींद्र कुलकर्णी, प्र-कुलगुरू प्रा. (डॉ.) अजय भामरे आणि आजीवन अध्ययन व विस्तार विभागाचे संचालक प्रा. (डॉ.) बळीराम गायकवाड यांचे मनःपूर्वक आभार मानले. आदिवासी समाजातून पुढे येत उच्च शिक्षण, प्रशासकीय सेवा आणि सामाजिक कार्याच्या क्षेत्रात स्वतःचा वेगळा ठसा उमटवणाऱ्या डॉ. कृष्णा पराड यांच्या या यशामुळे तरुण पिढीसमोर एक प्रेरणादायी आदर्श निर्माण झाला आहे. त्यांच्या या यशाबद्दल विविध स्तरांतून अभिनंदनाचा वर्षाव होत असून, त्यांच्या पुढील शैक्षणिक, प्रशासकीय आणि सामाजिक वाटचालीस शुभेच्छा दिल्या जात आहेत.

थोडक्यात बातम्या

श्री शिवाजी हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय किन्होळा शाळेचा नाविन्यपूर्ण उपक्रम; शाळा पालकांच्या दारी

अक्षराज : प्रतिनिधी

दि.३१, बुलढाणा : श्री शिवाजी शिक्षण संस्था, अमरावती द्वारा संचालित श्री शिवाजी हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय, किन्होळा येथे प्राचार्य जी.एच.राजपूत यांच्या मार्गदर्शनाखाली शाळा आपल्या दारी हा अभिनव उपक्रम वाडी, ब्रह्मपुरी, गावठाणा व किन्होळा येथे उत्साहात राबविण्यात येत आहे. यातील पहिला टप्प्याच्या उपक्रमांतर्गत वाडी गावामध्ये शिक्षकांनी प्रत्यक्ष पालकांच्या घरी भेटी दिल्या. विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीबाबत पालकांशी सविस्तर चर्चा करण्यात आली. यावेळी विद्यार्थ्यांना अध्ययनात येणाऱ्या अडचणी, त्यांच्या समस्या प्रत्यक्ष जाणून घेतल्या व पाल्याची अभ्यासातील प्रगती पालकांना समजावून सांगितले. पालकांनीही आपल्या प्रतिक्रिया व सूचना शिक्षकांसमोर मांडल्या.

या उपक्रमात शाळेतील सर्व शिक्षक वृंद सहभागी झाले होते. यामध्ये श्री.राजपूत, श्री.परिहार, श्री.चव्हाण, श्री.हिंगे, श्री.पडधान, श्री.सावळे, विवेक जाधव,मवाळ मॅडम, पडघान मॅडम, कु.सोनवणे मॅडम, कु.जाधव मॅडम व कर्मचारी उपस्थित होते सर्वांनी घरोघरी जाऊन पालक संपर्क केला. या उपक्रमामुळे पालक व विद्यार्थ्यांमध्ये आनंदाचे व समाधानाचे वातावरण निर्माण झाले असून पालक वर्गातून या उपक्रमाचे सर्वत्र कौतुक होत आहे. शाळा आणि पालक यांच्यातील दुवा अधिक घट्ट करण्यास हा उपक्रम निश्चितच उपयुक्त ठरेल असा विश्वास सर्व पालकांनी व्यक्त केला.

मुंबई महापालिका शाळांच्या कंदील स्पर्धा उत्साहात संपन्न

अक्षराज : प्रतिनिधी

दि.३१, मुंबई : बृहन्मुंबई महानगरपालिका शिक्षण विभाग अंतर्गत कार्यानुभव विभागाच्या वतीने कंदील स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होत. स्पर्धांचा पारितोषिक वितरण समारंभ व प्रदर्शन कार्यक्रम दि. ३० ऑक्टोबर रोजी सकाळी ११ वा. त्रिवेणी संगम मनपा शालेय सभागृह, करी रोड येथे संपन्न झाला. बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या सर्व भाषिक शाळा, एम.पी.एस., सीबीएसई, आयसीएसई अशा सर्व शाळेतील ६ वी ते ८ वी चे विद्यार्थी सहभागी झाले होते. ६ वी च्या विद्यार्थ्यांनी पणत्या, ७ वी च्या विद्यार्थ्यांनी कटवर्क रांगोळी आणि ८ वी च्या विद्यार्थ्यांनी आकाश कंदील तयार केले होते.

शिक्षणाधिकारी किर्तीवर्धन किरतकुडवे, उपशिक्षणाधिकारी (मध्यवर्ती) मुखतार शाह व अधिक्षक लक्ष्मण गोसावी (संगीत कला अकादमी) यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यानुभव विभागाच्या निदेशिका तृप्ती पेडणेकर यांनी उत्तम नियोजन करुन स्पर्धा व्यवस्थित पार पाडला.उपशिक्षणाधिकारी ममता राव, उपशिक्षणाधिकारी किसन केंकरे व आरती खैर, अधीक्षक छाया साळवे या मान्यवरांनी उपस्थित राहून पारितोषिक प्राप्त विद्यार्थ्यांचे व शिक्षकांचे कौतुक केले. तसेच शिक्षणाधिकारी (माध्यमिक) सुजाता खरे यांनी प्रदर्शनास भेट दिली.

पशुसंवर्धन आयुक्तांची रांजणगावला भेट

अक्षराज : राजकुमार इकडे

दि.३१, सुपा (अहिल्यानगर) : शनिवार, दिनांक ३१ ऑक्टोबर रोजी महाराष्ट्र राज्याचे पशुसंवर्धन आयुक्त डॉ.किरण पाटील यांनी मौजे रांजणगाव रोड तालुका पारनेर येथे दुष्काळ पाहणी व गोशाळा भेट दिली. त्यांच्या समवेत जिल्हा पशुसंवर्धन व दुग्ध विकास अधिकारी डॉ.उमेश पाटील, जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी डॉ.दशरथ दिघे, तालुका अधिकारी डॉ. गाडीलकर, डॉ.अरविंद रेपाळे, डॉ सागर नलावडे, डॉ महांडुळे, डॉ बोरुडे हे उपस्थित होते. सरपंच महेश दादा देशमुख, सरपंच बाळासाहेब यादव, प्राध्यापक चंद्रकांत शिंदे, सरपंच शरद भाऊ सरोदे, ग्रा.पं.सदस्य सचिन भाऊ यादव, ज्ञानदेव लोणकरयांनी ग्रामस्थ व ग्रामपंचायत तर्फे आयुक्त यांचा सत्कार करण्यात आला.

दिवाळी सणाच्या पार्श्वभूमीवर 'नवी मुंबई महापौर चषक किल्ले बांधणी स्पर्धा'

अक्षराज : जे.के.पोळ

दि.३०, नवी मुंबई : छत्रपती शिवाजी महाराजांचा गौरवशाली इतिहास, गड-किल्ल्यांची परंपरा आणि स्वराज्याची प्रेरणा जनमानसात रुजविण्याच्या उद्देशाने नवी मुंबई महानगरपालिकेच्या वतीने 'नवी मुंबई महापौर चषक किल्ले बांधणी स्पर्धा' आयोजित करण्यात आली आहे. या स्पर्धेच्या माध्यमातून महाराष्ट्राच्या समृद्ध ऐतिहासिक वारशाचे जतन, दुर्ग संवर्धनाविषयी जनजागृती आणि नागरिकांच्या विशेषत्वाने लहान मुले व युवकांच्या सर्जनशीलतेला प्रोत्साहन देण्याचा प्रयत्न करण्यात येणार आहे.ही स्पर्धा केवळ नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील सर्व नागरिकांसाठी खुली आहे. स्पर्धेत शालेय गट आणि खुला गट अशा दोन गटांचा समावेश करण्यात आला आहे. यामध्ये सहभागी स्पर्धकांना मातीच्या साहाय्याने ऐतिहासिक गड-किल्ल्यांच्या प्रतिकृती साकारण्याची संधी मिळणार आहे.

किल्ल्यांची रचना, ऐतिहासिक संदर्भ, कल्पकता आणि सादरीकरणाच्या माध्यमातून महाराष्ट्राच्या गौरवशाली दुर्गपरंपरेचे दर्शन घडविणे हा या स्पर्धेचा प्रमुख उद्देश आहे.स्पर्धेतील विजेत्यांना आकर्षक रोख पारितोषिके देण्यात येणार आहेत. खुल्या गटात प्रथम क्रमांकासाठी रु. ३०,०००, द्वितीय क्रमांकासाठी रु. २०,००० आणि तृतीय क्रमांकासाठी रु. १०,००० अशी पारितोषिके ठेवण्यात आली आहेत.शालेय गटात प्रथम क्रमांकासाठी रु. २५,०००, द्वितीय क्रमांकासाठी रु. २०,००० आणि तृतीय क्रमांकासाठी रु. १०,००० अशी पारितोषिके देण्यात येणार आहेत.याशिवाय दोन्ही गटात उत्तेजनार्थ प्रत्येकी रु. ५,००० ची तीन पारितोषिके देण्यात येणार आहेत. त्याचबरोबर सर्व विजेत्यांना सन्मानचिन्ह व प्रशस्तीपत्रक देऊन गौरविण्यात येणार आहे.